ISBN 978-93-5737-157-5

# बोध कायद्याचे

ॲड्. डॉ. सुरेशचंद्र रा. भोसले

'अटक' एक हत्यार

फास्ट ट्रॅक कोर्ट एक मृगजळ

खटले का तुंबतात ?

स्टेशन डायरी व पोलिस डायरी

पोलिस रिमांड (कोठडी)

पोलिस स्टेशन व पोलिस चौकी

लोकसेवक

फिर्याद

कोर्टापुढील खासगी फिर्याद

पंचनामा

जामीन

मृत्यूपूर्व जबाब

साक्षीदाराची साक्ष - महत्त्व



ISBN : 978-93-5737-157-5

# बोध कायद्याचे

ॲड्. डॉ. सुरेशचंद्र रा. भोसले

**बोध कायद्याचे**

**लेखक :** अ‍ॅड्. डॉ. सुरेशचंद्र रा. भोसले,
पुणे

**संपादक :** डॉ. सौरभ उबाळे व डॉ. अश्विनी इंगोले
मराठवाडा मित्रमंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे

**प्रकाशक**
मराठवाडा मित्रमंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय,
२०२/अ, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४
फोन : ८१४९३४०००४
Email : mmsclc@gmail.com
Website : www.sclc.edu.in

© **हक्क**
लेखक, संपादक व प्रकाशकाच्या स्वाधीन

**प्रकाशन**
प्रथमावृत्ती : २६ जानेवारी, २०२३

**मुद्रक**
प्रिन्ट व्ह्यू,
२९९, कसबा पेठ, फलटण – ४१५ ५२३
मोबा. : ९४२३८६७१६४

**मुखपृष्ठ**
श्री. अनिकेत पराडकर

**मूल्य**
**₹ २४९/-**

---

सर्व हक्क राखीव. लेखक, संपादक आणि प्रकाशकाच्या पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग, कोणत्याही स्वरुपात किंवा कोणत्याही प्रकारे पुनर्मुद्रित, अनुवादित अथवा रुपांतरित करता येणार नाही. या पुस्तकात प्रकाशित झालेली मते, घटना आणि वर्णन ही लेखकाची आहेत. यामध्ये कोणाचाही अवमान करायचा लेखक, संपादक अथवा प्रकाशकांचा हेतू नाही. पुस्तकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक अथवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

---

# प्रस्तावना व मनोगत

आपल्या देशातील फौजदारी कायदे स्वातंत्र्यपूर्व काळातील अर्थात कालबाह्य झालेले आहेत. कोणतेही सरकार हे कायदे संपूर्णपणे बदलून न्याय व्यवस्था प्रभावी व गतीमान करुन लोकांना लवकर न्याय देण्याची मानसिकतेमध्ये नाही.

विद्यमान परिस्थितीमध्ये सामान्य माणसाला शासन व न्याय व्यवस्था यामध्ये नक्की विलंब का होतो हे समजू शकत नाही. पोलिस यंत्रणाही प्रशासनातील महत्त्वाची भूमिका बजावणारा राज्य शासनाचा महत्त्वाचा स्नायू आहे.

कायद्यामधील तरतूदींची अंमलबजावणी लवकर होऊन लोकांना लवकरात लवकर अर्थात वेळेवर न्याय का मिळत नाही असा प्रश्न पडतो. यावर कुणीतरी प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

मी सुमारे ४२ वर्षे फौजदारी कायद्यांशी संबंधी वकीली केली. बप्रत्यक्ष कोर्टातील अनुभव व संशोधनावरुन काही गोष्टी लक्षात आल्या की ज्या सर्वसामान्य लोक व नवोदित वकीलांना उपयोगी पडतील म्हणून मी त्या सर्वांसमोर मांडण्याचा प्रयत्न या लिखाणातून केला आहे.

लोकसभेची विद्यमान परिस्थिती पहाता सरकारला सर्व कायदे बदलून गतीमान न्यायव्यवस्था करता येईल पण ईच्छाशक्ती अभावी हे केलं जात नाही. लोक यातून काही मार्ग काढू शकत नाहीत, परंतु नेमकं काय चालू आहे हे सामान्य जनतेला कळावं म्हणून हा लेखन प्रपंच मांडला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांचं राज्य होतं. त्यांचेच पोलिस होते. ते आपल्यावर राज्य करीत होते. पारतंत्र्यातील भारतीय जनतेवर राज्य करण्यासाठी ब्रिटीशांनी कायदे करताना त्यांच्या पोलिसांना अपरिमीत अधिकार दिले व त्यांच्यामार्फत आपल्यावर अन्यायकारक राज्य केले.

आता ब्रिटीश गेले, पण कायदे तेच राहिले. ब्रिटीश पोलिसांची जागा भारतीय पोलिसांनी घेतली, पण मानसिकता तीच राहिली. फक्त वर्दी बदलली. खटले कोर्टात न चालवता मध्यमवर्गीय किंवा समाजातील प्रतिष्ठित व्यक्तीला संशयावरुन अटक करायची, त्याला लवकर जामीन मिळू द्यायचा नाही आणि खटला न चालवता त्याला शिक्षा द्यायची व त्याची अप्रतिष्ठा करायची, ही ब्रिटीश नितीच आजही अवलंबली जात आहे.

कायद्यातील महत्त्वाच्या तरतूदी व त्यावरील उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या काही न्यायनिवाड्याच्या आधारे या विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या लिखाणात मी केला आहे.

आपल्या देशातील न्यायव्यवस्था प्रशासनाने सबळ केली आहे काय? असा प्रश्न पडतो. न्यायव्यवस्था दुबळी राहिली तर आपल्या देशाच्या घटनेची अंमलबजावणी कशी होणार असा प्रश्न जनतेसमोर येऊ शकतो. सर्वांना अंतरमुख करायला लावणारा विषय आहे.

कायद्याचं महत्त्वाचं तत्त्व आहे की, ''शंभर अपराधी सुटले तरी चालतील पण एकाही निरपराध माणसाला शिक्षा होता कामा नये.'' तसेच ''न्यायदानाला विलंब म्हणजे न्याय नाकारण्यासारखे आहे. '' सध्या आपल्याकडे प्रशासनाकडून आवश्यक त्या सहकार्याविना जनतेला न्याय नाकारला जात आहे. हा प्रशासनाचा नाकर्तेपणा आहे, हे आपल्यासमोर मांडण्याचा हा एक प्रयत्न आहे.

**- डॉ. सुरेशचंद्र रा. भोसले**
अॅडव्होकेट

# अनुक्रमांक


| | | | |
|---|---|---|---|
| क्रमांक | १ | फास्ट ट्रॅक कोर्ट एक मृगजळ | / ७ |
| क्रमांक | २ | ‘अटक’ एक हत्यार | / १० |
| क्रमांक | ३ | खटले का तुंबतात ? | / १४ |
| क्रमांक | ४ | फिर्याद | / १८ |
| क्रमांक | ५ | पंचनामा | / २२ |
| क्रमांक | ६ | साक्षीदाराची साक्ष – महत्त्व | / २७ |
| क्रमांक | ७ | स्टेशन डायरी व पोलिस डायरी | / २९ |
| क्रमांक | ८ | जामीन | / ३२ |
| क्रमांक | ९ | लोकसेवक | / ३७ |
| क्रमांक | १० | पोलिस रिमांड (कोठडी) | / ४१ |
| क्रमांक | ११ | पोलिस स्टेशन व पोलिस चौकी | / ४४ |
| क्रमांक | १२ | कोर्टापुढील खासगी फिर्याद | / ४७ |
| क्रमांक | १३ | खटले खारीज करण्याचे विशेष अधिकार | / ४९ |
| क्रमांक | १४ | मृत्यूपूर्व जबाब | / ५१ |



**ॲड. डॉ. सुरेशचंद्र रा. भोसले**

सुरेशचंद्र भोसले यांच्याकडे कायद्याची डॉक्टरेट पदवी आहे. ते गेल्या ३५ हुन अधिक वर्षांपासून ट्रायल कोर्ट आणि हायकोर्टात प्रॅक्टिस करत आहेत. त्यांनी १९८६ ते १९९५ या काळात पुण्यात सहाय्यक जिल्हा सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून काम केले. ते भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत सीबीआयचे विशेष सरकारी वकील देखील होते. डॉ. भोसले यांना सत्र न्यायालये, कामगार न्यायालये, औद्योगिक न्यायालये, सहकारी न्यायालये, ग्राहक मंच, टाडा न्यायालये. मकोका न्यायालये इ. येथे वकील म्हणून सरावाचा मोठा अनुभव आहे. डॉ. भोसले हे बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे माजी सदस्य आहेत आणि पूर्वी ते २००४-०५ मध्ये अध्यक्ष होते. त्यांनी पुणे विद्यापीठाच्या विधी विद्याशाखेचे अधिष्ठाता तसेच व्यवस्थापन परिषद, शैक्षणिक परिषद, पुणे विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य म्हणून काम पहिले आहे. डॉ. भोसले यांनी 'हुंडा मृत्यूविषमीचे कामदे' आणि 'महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ ही दोन पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी विविध कायदेविषयक जर्नल्स आणि वृत्तपत्रांसाठी कायदेशीर आणि सामाजिक विषयांवर लेखन केले आहे. विविध लॉ जर्नल्समध्ये त्यांचे लेख प्रकाशित झाले आहेत. ते बॉम्बे लॉ रिपोर्टरच्या सल्लागार समितीचे सदस्य आणि महाराष्ट्र लॉ अकादमीचे अध्यक्ष होते.

---



**श्री. भाऊसाहेब जाधव**

कार्यकारी अध्यक्ष, मराठवाडा मित्र मंडळ, पुणे

सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या प्रेरणेतून स्थापन झालेले मराठवाडा मित्र मंडळ १९६७ मध्ये धर्मादाय संस्था म्हणून स्थापन केले गेले. 'येथे बहुतांचे हित' हे ब्रीदवाक्य घेऊन विविध शैक्षणिक कॅम्पसमध्ये, आर्किटेक्चर, व्यवस्थापन, कायदा, वाणिज्य, फार्मसी आणि अभियांत्रिकी इत्यादी विषयातील १७००० हून अधिक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या उत्कृष्ट सुविधा पुरविल्या जातात. अलीकडेच मराठवाडा मित्र मंडळाच्या चार महाविद्यालयांना राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदे द्वारे 'अ' श्रेणी प्राप्त झाली आहे. मराठवाडा मित्र मंडळाच्या शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालयाची स्थापना २००३ मध्ये, भविष्यातील विधी व्यावसायिक आणि संशोधकांना चांगले जग निर्माण करण्यासाठी रचनात्मक भूमिका बजावण्याच्या उद्देशाने आदर्श आणि मूल्ये असलेले शिक्षण देण्याच्या दृष्टीने करण्यात आली. हे महाविद्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न आहे, ज्याला बार कौन्सिल ऑफ इंडियाने मान्यता दिली आहे, महाराष्ट्र सरकारने खडज प्रमाणपत्राने मान्यता दिली आहे आणि राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदे द्वारे 'अ' श्रेणी प्राप्त झाली आहे. महाविद्यालय अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी शैक्षणिक आणि संशोधन सामंजस्य कराराने जोडले गेले आहे. अशा प्रकारे भारतातील प्रमुख कायदा महाविद्यालयांपैकी एक म्हणून उभे आहे.

₹ 249

9 789357 371575